ePaper
“ठिगळ्या-ठिगळ्यांची गोधडी म्हणजे... राज ठाकरे – सुषमा अंधारें!

| वर्ष - 7 | अंक - 301 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- सुर्याने हार्टब्रोकन इमोजी शेअर केला
- बादशाहने हनी सिंगची उडवली खिल्ली
- मनसेच्या एन्ट्रीने रस्सीखेच वाढली
- भाजपचे हिंदुत्व थापेबाज आहे!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 20 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# विध्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहात लावले कॅमेरे

# जयहिंद हायस्कुलला मनसेचा दणका!

## पुन्हा असा प्रकार घडल्यास गाठ मनसेशी; शाळा प्रशासनाला मनसेचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज :

**पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमध्ये मुले व मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. दरम्यान मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत शाळेची पाहणी केली व शाळा प्रशासनाला ‘पुन्हा असा प्रकार घडल्यास तर गाठ मनसेशी राहील, असा इशारा दिला. यावेळी शाळा प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे हटविण्यात आले असल्याची माहिती दिली.**



याबाबत सविस्तर वृत्त असे की, पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमधील स्वच्छतागृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले असल्याचा व्हिडिओ सामाज माध्यमांवर व्हायरल झाला होता. त्यानंतर विविध माध्यमातून याबाबत तीव्र आक्षेप घेण्यात आले. तर पालकांनीही याला विरोध केला होता. याबाबत विचारणा करण्यासाठी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, महिला शहराध्यक्ष सीमा बेलापूरकर, नितीन चव्हाण, मनोज लांडगे, तुषार सोनटक्के, अंकित शिंदे, अक्षय देसले, देवेंद्र निकम, शंकर तरपडे व पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिली. संपुर्ण शाळेची पाहणी केल्यानंतर स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यामुळे मुलांच्या गोपनीयतेचा भंग होत असल्याचा आरोप करत मनसे पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, ‘शाळेत पुन्हा असा प्रकार घडल्यास तर गाठ मनसेशी राहील, असा इशारा देण्यात आला. यावेळी मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले म्हणाले की, शाळेत असे प्रकार घडणे अत्यंत संतापजनक आहे. शिक्षणाचे माहेर घर म्हणून लौकिक मिळविलेल्या पुण्यात असे प्रकार सहन केले जाणार नाहीत. शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी वर्गासाठी मनसे सदैव तत्पर आहे. शिक्षण विभागाने या गैर प्रकाराची तात्काळ दखल घेत कारवाई करावी,अशी मागणी सचिन चिखले यांनी केली.

### ...अखेर शिक्षण विभागाने सीसीटीव्ही कॅमेरे हटविले

» पिंपरी चिंचवड शहरातील जयहिंद हायस्कूलमधील स्वच्छतागृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पिंपरी महापालिकेच्या शिक्षण विभागालाही खडबडून जाग आली. प्रशासनाने शाळेत जात तेथील कॅमेरे हटवले आहेत. तसेच शाळेला याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

# मावळ लोकसभा मतदारसंघात उषाताई वाघेरेही प्रचारात..!

## ग्रामस्थांच्या भेटी घेऊन साधला जातोय संवाद; महिला वर्गाचा उदंड प्रतिसाद

।वडगाव मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील हे रिंगणात उतरले आहेत. त्यांचा संपूर्ण मतदारसंघात झंझावाती दौरा सुरू आहे. त्यांच्याबरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून पत्नी उषाताई संजोग वाघेरे मतदारसंघातील खेड्यापाड्यात जाऊन ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्गाशी संवाद साधून संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठविण्याची साद घालत आहेत. या दौ-यात त्यांना महिला वर्गाचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.**



उषाताई संजोग वाघेरे यांनी यांनी मावळ तालुक्यातील खामशेत, पिंपोळी, ताज, बोरज, पाटण, देवले आणि सदापुर गावातील ग्रामपंचायत, तसेच ग्रामस्थांच्या घरी जावून सदिच्छा भेट दिली. उषाताई वाघेरे यांचे महिला वर्गाकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिलेदार म्हणून संजोग वाघेरे पाटील मावळ मतदारसंघात बदल घडविण्यासाठी कटिबध्द आहेत. त्यांचा निरोप घेऊन उषाताई वाघेरे मावळ लोकसभा मतदार संघात विविध गावांमध्ये आणि घरोघरी जाऊन ते आपुलकीने ग्रामस्थांच्या भेटी घेत आहेत. तसेच, मतदारसंघातील विशेषत: महिला मतदारांच्या गाठीभेटी घेत त्यांना साद घालत आहेत.

या दौ-यात संगीता मरगज, शलाका माळसकर, लता गायकवाड, मनीषा कांबळे, वासंती शिंदे, भाग्यश्री कापसे, उषा शिंदे, शारदा वाघेरे, ज्योती वाघेरे, नंदा वाघेरे, रत्न पवळे, कविता सातकर, राधा सातकर, साधना गोलांडे, स्मिता वाघेरे, कांचन गोलांडे, रसिका वाघेरे, कुंदा शिंदे, गणेश मस्के, आदिनाथ वाघेरे, प्रणव वाघेरे, कृष्णा वाघेरे, अजिंक्य राक्षे, पोपट सर, आरती कुदळे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घरोघरी उध्दव ठाकरे साहेबांचा संदेश पोहोचणार – उषाताई वाघेरे

» उषाताई वाघेरे म्हणाल्या की, उध्दव ठाकरे साहेब यांच्या घोषणेनंतर संपूर्ण मतदारसंघात पक्षात संजोग वाघेरे पाटील हे नाव पोहोचले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिक निवडणूक प्रचारात उतरले आहेत. घरोघरी जाऊन ते उध्दव ठाकरे साहेबांचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवत आहेत. या कार्याचा मी देखील एक भाग आहे. आम्ही दिवसभर महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थांना भेटत असताना सर्वांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. म्हणून आम्हाला पूर्ण विश्वास आहे की संजोग वाघेरे पाटील निवडून येतील. मावळ लोकसभेतील मतदार त्यांना लोकसभेत पाठवतील. ग्रामीण भागातील असणारे नागरिकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न, तसेच गावात रस्ते, वीज, पाणी असे विविध प्रश्न सोडविण्यासाठी ते प्रयत्न करतील, असा विश्वास उषाताई वाघेरे यांनी व्यक्त केला आहे.

# वसंत मोरेंची पुढची राजकीय वाटचाल काय?

## आजपासून निवडणुकीला 55 दिवस आहेत : वसंत मोरे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही दिवसांपूर्वीच पुण्यात वसंत मोरे यांनी मनसेला रामराम ठोकल्यामुळे मोठी राजकीय चर्चा झाल्याचं पाहायला मिळालं. वसंत मोरे यांनी पुण्यातील मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर टीका करत पक्षातून बाहेर पडत असल्याचं जाहीर केलं. त्यामुळे मनसेच्या पुण्यातील संघटनेमध्ये सारंकाही आलबेल नसल्याचं दिसून आलं.**



मात्र, त्यापाठोपाठ आता वसंत मोरेंची पुढची राजकीय वाटचाल कशी असेल? यावर तर्क-वितर्कांना उधाण आलं होतं. यासंदर्भात वसंत मोरेंनी आज माध्यमांशी बोलताना सूचक विधान केलं आहे.वसंत मोरे यांनी यावेळी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याचं सांगितलं. “पुढील राजकीय वाटचालीसंदर्भात आम्ही लोकांकडून मत जाणून घेतोय. लोक बऱ्याचदा काही पर्याय सुचवतात. पण ते निवडताना पुण्याचं हित झालं पाहिजे त्या दृष्टीने पावलं टाकतोय”, असं ते म्हणाले.“मी मविआकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करतोय. कारण इथे फक्त निवडणुका लढायच्या नाहीयेत तर जिंकायच्याही आहेत. त्यामुळे जिंकण्यासाठी लढायचं असेल तर योग्य ट्रॅकवर असणं गरजेचं आहे. मी योग्य ट्रॅकवरच असून त्यात यशस्वी होईन असं मला वाटतं”, असं वसंत मोरेंनी नमूद केलं.दरम्यान, पुणे लोकसभा मतदारसंघाची निवडणूक एकतर्फी होईल, यावर वसंत मोरेंनी यावेळी विश्वास व्यक्त केला. “आजपासून निवडणुकीला ५५ दिवस आहेत. त्यामुळे कमी दिवस वगैरे काही नाही. ज्या दिवशी वसंत मोरे रिंगणात उतरेल, त्या दिवशी पुणे लोकसभेच्या निवडणुकीत खऱ्या अर्थाने रंगत येईल. तेव्हा आपण निवडणूक कशी एकतर्फी होईल हे पाहू”, असं ते म्हणाले. तसेच, दुसऱ्या पक्षात जाण्याआधीच पक्ष सोडल्याबाबत विचारलं असता “माझी वेळ नक्कीच चुकलेली नाही. मी वेळ घेतोय. योग्य वेळी मी योग्य निर्णय घेईन”, असं ते म्हणाले.यावेळी बोलताना वसंत मोरेंनी भाजपा नेते व पुण्यातील आमदार चंद्रकांत पाटील यांना टोला लगावला. “वसंत मोरे अपक्ष म्हणून निवडणुकीला उभे राहिले, तर त्यानं आम्हाला फारसा फरक पडणार नाही”, असं विधान चंद्रकांत पाटलांनी केल्याबाबत विचारणा केली असता वसंत मोरेंनी त्यावर खोचक टिप्पणी केली. “तसा फरक पडला नसता तर २०२२ ला ते मला म्हणालेच नसते की तुम्ही भाजपात या. मॅरिएट हॉटेलमध्ये मला सकाळ समूहानं पुरस्कार दिला होता.

### जिंकण्यासाठी लढायचं असेल तर...

» तेव्हा उघडपणे चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं होतं की तुम्ही भाजपात या, तुम्ही निवडून याल. मी तेव्हाच त्यांना सांगितलं की माझ्या तिन्ही टर्म भाजपाविरोधात झाल्या आहेत आणि तिन्ही वेळा मी यशस्वी झालो आहे. त्यामुळे माझ्या उमेदवारीनं काय फरक पडेल हे पुणेकर त्यांना दाखवेल”, असं अप्रत्यक्ष आव्हानच त्यांनी चंद्रकांत पाटील यांना दिलं.मात्र, त्यापाठोपाठ आता वसंत मोरेंची पुढची राजकीय वाटचाल कशी असेल? यावर तर्क-वितर्कांना उधाण आलं होतं. यासंदर्भात वसंत मोरेंनी आज माध्यमांशी बोलताना सूचक विधान केलं आहे. वसंत मोरे यांनी यावेळी त्यांच्या राजकीय भविष्याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याचं सांगितलं. “पुढील राजकीय वाटचालीसंदर्भात आम्ही लोकांकडून मत जाणून घेतोय. लोक बऱ्याचदा काही पर्याय सुचवतात. पण ते निवडताना पुण्याचं हित झालं पाहिजे त्या दृष्टीने पावलं टाकतोय”, असं ते म्हणाले.“मी मविआकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करतोय. कारण इथे फक्त निवडणुका लढायच्या नाहीयेत तर जिंकायच्याही आहेत. त्यामुळे जिंकण्यासाठी लढायचं असेल तर योग्य ट्रॅकवर असणं गरजेचं आहे. मी योग्य ट्रॅकवरच असून त्यात यशस्वी होईन असं मला वाटतं”, असं वसंत मोरेंनी नमूद केलं.

# आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का?

## श्रीनिवास यांच्या वक्तव्यासंदर्भात सुप्रिया सुळे यांचा सवाल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का? इतकाही अधिकार या देशात राहिला नाही का?, असे सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केले.**





काटेवाडी येथील कार्यक्रमात गावकऱ्यांशी संवाद साधताना श्रीनिवास पाटील यांनी केलेले भाषण ही अजित पवार यांच्यावर केलेली टीका असल्याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सुरू झाली. त्यासंदर्भात बारामतीमध्ये बोलताना सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार हे कायमच माझा प्रचार करत आले आहेत. त्यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली असे मला वाटत नाही. काटेवाडी हे श्रीनिवास पवार यांचे गाव आहे. त्यांच्या मित्रपरिवारासमोर त्यांनी मन मोकळ केले इतकेच आहे. एखाद्या माणसाने आपल्या घरात, आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का? इतकाही अधिकार या देशात राहिलेला नाही का, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला. बारामतीमध्ये शरद पवार यांना हरविणे हे एकच लक्ष्य असल्याचे विधान उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले होते. त्याचा समाचार घेताना विकासाचे मुद्दे, दुष्काळाची परिस्थिती, महागाई, बेरोजगारी, टँकर, पिकांना हमीभाव असा मुद्दे न घेता केवळ शरद पवार यांना हरविण्याचे ध्येय ठेवणे हे दुर्दैवी आहे, अशी प्रतिक्रिया खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.हा सुसंस्कृत महाराष्ट्र आहे. वैचारिक लढाई आहे. ज्या पद्धतीने संपविण्याची भाषा, धमक्या देतात ही भाषा राज्याला शोभत नाही. जे मनात आहे ते त्यांच्या ओठावर आले. सूडाचे आणि गलिच्छ राजकारण ते करतात. विकासाचा मुद्दा त्यांच्यासाठी महत्वाचा नाही हे समोर आले, अशी टिप्पणी सुळे यांनी बारामतीमध्ये बोलताना केली.त्यासंदर्भात बारामतीमध्ये बोलताना सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. श्रीनिवास पवार आणि शर्मिला पवार हे कायमच माझा प्रचार करत आले आहेत. त्यांनी अजित पवार

### त्यांनी मन मोकळ केले इतकेच

» त्यांच्या मित्रपरिवारासमोर त्यांनी मन मोकळ केले इतकेच आहे. एखाद्या माणसाने आपल्या घरात, आपल्या माणसांसमोर मन मोकळे करायचे नाही का? इतकाही अधिकार या देशात राहिलेला नाही का, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला. बारामतीमध्ये शरद पवार यांना हरविणे हे एकच लक्ष्य असल्याचे विधान उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात खासदार

# मावळ लोकसभेसाठी वाढली भाजपाची 'बार्गेनिंग पॉवर'!

## मतदार संघात भाजपा अन् मित्र पक्षांची ताकद

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभेसाठी दावा करत माजी मंत्री बाळा भेगडे यांनी मैदानात उडी घेतली आहे. तेव्हापासून या लोकसभा मतदारसंघात उमेदवारीसाठी सुरू असलेल्या रस्सीखेचाची रंगत आणखीन वाढणार आहे. मावळ लोकसभेतील दोन विधानसभेत भाजपाचे आमदार आहेत. एका ठिकाणी अपक्ष आमदाराने पाठिंबा दिला आहे. दोन विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार आहेत. तर एका ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसनेचा आमदार आहे. लोकसभेच्या सहाही विधानसभेत भाजपाची ताकद अधिक असल्याने या मतदारसंघावरील दावेदारी करण्यात भाजपाची 'बार्गेनिंग पॉवर' वाढली असल्याचे चित्र आहे.**



पुर्वी भाजपा आणि शिवसेना युतीच्या पॅटनमध्ये मावळ लोकसभेची जागा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सोडली जात होती. सध्या शिवसेना आणि राष्ट्रवादीतील पक्षफुटीमुळे राजकीय चित्र बदलले आहे. उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत गेल्याने ते या जागेवर आपला उमेदवार लढवत आहेत. मात्र महायुतीमध्ये जागेसाठी धुसफूस सुरू आहे. विद्यमान खासदार असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक खासदार श्रीरंग बारणे यांच्यासाठी हा मतदारसंघ सोडला जाइल असे स्पष्ट होते. मात्र मावळचे आमदार सुनिल शेळके यांनी अजित दादांच्या राष्ट्रवादीला जागा सोडण्याची मागणी करून राजकीय ट्वीस्ट वाढविला आहे. आमदार शेळके यांनी कामाचे कार्ड दाखवा म्हणत थेट खासदार बारणे यांनाच राजकीय दृष्ट्या अंगावर घेतले. या दोन पक्षांमध्ये जुंपलेली असताना आता भाजपा देखील मागे राहिले नसल्याचे चित्र आहे. मावळचे माजी आमदार बाळा भेगडे यांनीही उमेदवारीच्या स्पर्धेत उडी घेत आपले उपद्रव मुल्य दाखविले आहे. मात्र भेगडे यांच्या व त्यांच्या मागणीला राजकीय वजन आहे. मावळ लोकसभेअंतर्गत येणाऱ्या विधानसभांचा विचार केल्यास भाजपाची मोठी ताकद उभी राहिल्याचे चित्र आहे. परिणामी भाजपा या जागेवरचा दावा सहजासहजी सोडताना दिसत नाही. मावळ लोकसभेतील पनवेल विधानसभेत प्रशांत ठाकूर हे भाजपाचे आमदार विजयी झाले आहेत. चिंचवड विधानसभेत भाजपाचा आमदार असून या ठिकाणी पक्षाचे मोठे वर्चस्व आहे. मावळमध्ये भाजपाचे माजी मंत्री बाळा भेगडे यांना मानणारा मोठा वर्ग आहे. कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आहेत. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत.

त्यामुळे त्यांचाही फायदा महायुतीला होणार आहे. उरण विधानसभेचे आमदार महेंद्र बालदी अपक्ष निवडणूक लढवून ते जिंकले आहेत. नंतर त्यांनी भाजपाला आपला पाठिंबा जाहिर केला आहे. सर्व विधानसभेतील ही राजकीय स्थिती पाहता भाजपाच्या उमेदवारीची वाट सोपी असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच बाळा भेगडे या मतदारसंघावर आपला हक्क दाखवत असल्याची चर्चा आहे.

### खा. श्रीरंग बारणेंना देखील कमळाचा ओढा ?

खासदार श्रीरंग बारणे यांना मावळ लोकसभेची चांगलीच समज आहे. कोणत्या वेळी काय निर्णय घ्यायचा या बाबत बारणे चाणाक्षपणे डाव टाकतात. त्यामुळेच काँग्रेस मध्ये असताना शिवसेनेचे धनुष्यबाण उचलून मावळातून खासदार झाले. सध्याची राजकीय स्थिती पाहता कमळ हातात घेतल्यास राजकीय प्रवास सुखकर होइल याची देखील जाण खासदार बारणे यांना आहे. त्यामुळे गेल्या वर्षभरापासून ते भाजपाकडे जातील, असे सुतोवाच देत होते. त्यांनी अद्याप उघड भूमिका घेतली नसली तरी त्यांचा डाव तोच असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. हे ओळखून भाजपा पदाधिकाऱ्यांनी आधीच आपला विरोध दर्शविण्यास सुरूवात केली आहे. एकूणच भाजपाला या मतदारसंघात सकारात्मक पार्श्वभूमी असल्याने प्रत्येक जण भाजपातून लढण्याचा विचार करत असल्याचे दिसत आहे.

---

# चिखलीत नदीपात्रात सुरू असलेल्या बांधकामावर हातोडा

## सुमारे 3600 चौ.फुट क्षेत्रातील चालु असलेले अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील चिखलीतील रिव्हर रेसिडन्सी मागील इंद्रायणी नदीपात्र क्षेत्रात चालू असलेल्या अनधिकृत विनापरवाना बांधकामावर निष्कासनाची कारवाई करून सुमारे ३६०० चौ.फुट क्षेत्रातील चालु असलेले अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे – पाटील, यांचे निर्देशानुसार कारवाई करणेत आली.**



शनिवार दि.१६ मार्च रोजी क क्षेत्रीय कार्यालयाचे पथकामार्फत उपआयुक्त अण्णा बोदडे तसेच उपअभियंता सुर्यकांत मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता किरण सगर, रचना दळवी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक निकिता फ़डतरे, स्मिता गव्हाणे व मनपा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल, महाराष्ट्र पोलिस, यांच्या नियंत्रणाखाली सदर कारवाई करण्यात आली. आज अखेर प्रभाग क्र.०२ चिखली / जाधववाडी परिसरातील सुमारे १०,३०० चौ.फुट आरसीसी बांधकामावर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली. दि.१६/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत क क्षेत्रीय कार्यालयाकडील अतिक्रमण पथक, महाराष्ट्र सुरक्षा बल व महाराष्ट्र पोलीस पथक, सहभागी झाले होते.

### विनापरवाना बांधकाम करू नये : आयुक्त

दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे. नागरिकांनी रस्त्यांवर बेवारस वाहने उभी करुन नये, तसेच अनधिकृत टप-या व पत्राशेड व बॅनर्स उभारु नये.तसेच फुटपाथ स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशनानुसार सदर कारवाई केलेल्या ठिकाणी मनपा परवानगी घेतल्याशिवाय अनधिकृत पत्राशेड / बांधकाम करु नये, अशा सुचना देण्यात आल्या. नदी पात्र व इतर परिसरात नागरिकांनी अनधिकृत विनापरवाना बांधकाम करू नये अन्यथा कारवाई करण्यात येईल असे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

# रोखे रोखले, आता नवे मार्ग शोधूया!



भूमिका

**राजकीय पक्षांना होणाऱ्या निधीपुरवठ्याची गत आता 'ये रे माझ्या मागल्या' अशी होऊन, रोखीचे व्यवहार चालू होणार का? तसे करणे टाळायचे आहे- म्हणून तर पर्यायी पारदर्शक उपायांची चर्चा माजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या या टिपणात आहे..**

निवडणूक रोखे योजना घटनाबाह्य आणि म्हणून बेकायदा असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर अखेर आता स्टेट बँकेने त्यांच्या ताब्यातील माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सुपूर्द केल्यामुळे सध्या चर्चा सुरू आहे ती कोणी किती दिले, देणारे आधी अडचणीत होते आणि रोखे-खरेदीनंतर नव्हते, यामुळे देणगी आणि सरकारी मोबदला यांचा संबंध आहे का? यातल्या 'देवाण घेवाणी'चे प्रकार काय असू शकतात, याचीच. ही चर्चा बिनमहत्त्वाची नसली तरी मुद्दा 'नागरिकांना संपूर्ण माहिती पारदर्शकपणे मिळणे' हा आहे.



हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे कारण तो थेट निवडणुकांच्या मुख्य घटकाशी- अर्थात राजकीय वित्तपुरवठ्याशी संबंधित आहे. याला मी मुख्य घटक म्हणतो कारण हा अर्थपुरवठाच आपल्या लोकशाहीच्या चारित्र्यावर सखोल परिणाम घडवतो. माजी अर्थमंत्री दिवंगत अरुण जेटली यांनीसुद्धा (ही रोखे योजना मांडताना) २०१७ च्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले होते की, राजकीय निधीच्या पारदर्शकतेशिवाय मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका शक्य नाहीत.

अशा पारदर्शकतेवर आधारित मुक्त, निष्पक्ष निवडणूक होणे, ही लोकशाहीची गरज. त्यामुळे ऐतिहासिक निर्णयासाठी न्यायालयाचे कौतुक केले पाहिजे, परंतु तो निर्णय म्हणजे एक टप्पा ठरतो, हे ओळखणेही आवश्यक आहे. उशिरा का होईना, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आपत्ती टळली, पण तेवढ्याने 'पारदर्शक राजकीय वित्तपुरवठा' या मूलभूत समस्येचे निराकरण झाले नाही. म्हणूनच, यापुढे भारतीय लोकशाहीची वाटचाल सुधारू शकतील अशा पर्यायांचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की या निकालाने निवडणूक रोख्यांसंबंधीचा कायदा घटनाबाह्य ठरवला गेला आहे, आणि त्या अनुषंगाने कंपनी कायदा, प्राप्तिकर कायदा, लोकप्रतिनिधित्व कायदा इत्यादी अन्य कायद्यांमधील सर्व संबंधित दुरुस्त्याही रद्दबातल ठरलेल्या आहेत. ही रोखे योजना नसतानासुद्धा (२०१८च्या आधी) राजकीय निधीपुरवठा मोठ्या प्रमाणावर अपारदर्शक होता हे खरे, सर्व देणग्यांपैकी ७० टक्के देणग्या रोख स्वरूपात होत्या हेही खरे. परंतु २० हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या सर्व देणग्या निवडणूक आयोगाला कळवण्याचे बंधन त्या वेळी होते आणि या देणग्यांची पडताळणी निवडणूक आयोगाने केल्यानंतरच संबंधित देणगीदार- कंपन्या यांना आयकर सवलतीसाठी पात्र ठरवले जात होते. निवडणूक रोखे योजना लागू झाल्यानंतर देणगी कोणी दिली आणि कोणाला मिळाली याबद्दल संपूर्ण गुप्तता पाळली गेली. त्यामुळेच 'देवाणघेवाणी'बद्दलच्या संशयांना अधिक वावर उरला. मग आता इथून पुढला मार्ग काय असू शकतो? निवडणुकीतील भ्रष्टाचार हा अनेक दशकांपासून चर्चेचा विषय आहे. अनेक खासदारांनी वेगवेगळे उपाय सुचवले आहेत. यादृष्टीने शेवटचा गंभीर प्रयत्न १९९९ मध्ये झाला होता, जेव्हा इंद्रजीत गुप्ता समितीने सर्वच राजकीय पक्षांसाठी, त्या-त्या पक्षांमधली अंतर्गत लोकशाही कशी आहे यावर त्यांना सार्वजनिक निधी (सरकारकडूनच पैसा) द्यावा, अशी शिफारस केली होती. पण 'पक्षांतर्गत लोकशाही' हे एक स्वप्नच राहिले आहे, त्यामुळे त्या सुधारणा कधी सुरूच होऊ शकल्या नाहीत. 'निवडणुकांसाठी सरकारचा निधी' हा खासा उपाय म्हणून नेहमीच चर्चेत असतो, पण मी या चर्चेशी सहमत नाही कारण निवडणुकीत खर्च केलेल्या पैशावर लक्ष ठेवणे अशक्य आहे. यामुळे निवडणूक लढवण्याचे गांभीर्य नसलेल्या आणि निव्वळ सरकारी निधी मिळवून टामटूम राहावे असे वाटणाऱ्या सोम्यागोम्या उमेदवारांचा उदयदेखील होईल. त्याऐवजी मी जो उपाय सुचवत आहे तो म्हणजे राजकीय पक्षांना निधी देणे- तोही निवडणुकीसाठी म्हणून नव्हे- तर त्यांच्या निवडणूक कामगिरीच्या आधारे निधीपुरवठा करणे. पक्षाने आदल्या निवडणुकीत मिळवलेल्या प्रत्येक मतासाठी १०० रुपये सरकारने त्या पक्षाला द्यावेत, अशी माझी सूचना आहे. या रकमेबद्दल चर्चा होऊ शकते पण आराखडा हा असेल. म्हणजे उदाहरणार्थ, आगामी सार्वत्रिक निवडणुकीत, समजा एकंदर ६५ कोटी मते सर्व राजकीय पक्षांना मिळाली.

## संपादकीय »

### 'मी' मज हरपून..

*धर्मस्थळी झुकणारा, विरोधकांना संपवणारा नेता मिळाला की 'समोर आहेच कोण' असे जनतेला वाटू लागते.*

समोर विरोधक नावालाही नसलेल्या निवडणुकीत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे ८७ टक्के मते पडून 'विजयी' झाले. पुढील काळात उरलेल्या १३ टक्क्यांची मते का मिळाली नाहीत आणि मुख्य म्हणजे ते १३ टक्के कोण याचा शोध घेण्याचा प्रयत्न पुतिन करणारच नाहीत, असे नाही. गेल्या पाच निवडणुकांत ते अशाच मताधिक्याने निवडून आले. त्या निवडणुकांत त्यांचे जे काही विरोधक होते ते नंतरच्या निवडणुकांत दिसेनासे होत गेले. एक सरळ क्रेमलिनसमोर गोळ्या घालून मारला गेला तर दुसरा तुरुंगात अचानक कोसळला. आणखी कोणी लंडनच्या उद्यानात विषबाधेने गेले तर कोणाचा मृतदेह परदेशातील त्याच्या निवासस्थानाच्या न्हाणीघरात आढळला. अर्थात यातील कोणाही हत्येचे मारेकरी कधीही सापडले नाहीत आणि त्यांचा शोध घेण्याची, त्यांस शासन केले जावे याची गरज बहुतांश सामान्य रशियनांस वाटली नाही.

अमेरिकेसारख्या देशानेसुद्धा व्हिएतनाम युद्धानंतर फक्त व्हिएतनामी निर्वासितांच्याच नागरिकत्वाला विशेष त्वरेने सवलत दिली होती की नाही? म्हणजे अशा निवडक श्रेणींना वेळोवेळी नागरिकत्व देणे यात टीका करण्यासारखे काहीच नाही. मुस्लिमांचा तर उल्लेखदेखील 'सीएए'मध्ये नाही; मग हा कायदा मुस्लीमविरोधी ठरवण्यात काय अर्थ आहे?

## 'सीएए'च्या वचनपूर्तीचे समाधान!

संसदेने १० डिसेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याचे (सीएए) नियम सरकारकडून आता राजपत्रित केले जात असताना, म्हणजे या कायद्याच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला असताना, या कायद्याला धर्मनिरपेक्षताविरोधी म्हणणारा आणि निर्वासितांचा दर्जा ठरवण्यासाठी धर्माचा आधार नकोच, असा युक्तिवाद पुन्हा उफाळून आला आहे. जागतिक स्तरावर, धर्म हा छळाच्या मुख्य घटकांपैकी एक मानला जातो आणि निर्वासित स्थितीसाठी तो एक महत्त्वाचा निकष आहे. नागरिकत्वाच्या अमेरिकी कायद्यात (यूएस कोड बुकमध्ये) 'वंश, धर्म, राष्ट्रीयत्व, विशिष्ट सामाजिक गटातील सदस्यत्व किंवा राजकीय मतामुळे छळ होण्याची वाजवी भीती' असलेल्यांबद्दल विशेष मानवतावादी काळजी बाळगून, अशी कोणतीही व्यक्ती निर्वासित मानली जाते. छळ झालेल्या अल्पसंख्यांकांच्या यादीतून मुस्लिमांना वगळल्यामुळे




'सीएए मुस्लीमविरोधी आहे,' अशी व्यर्थ टीका होते आहे. वास्तविक हा कायदा मुस्लिमांविरुद्ध काहीही बोलत नाही. बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या- ज्यांनी खूप पूर्वी स्वत:ला इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित केले अशा- तीन शेजारी देशांमधील अल्पसंख्याक समुदायांच्या धार्मिक छळाच्या बळींबद्दलच हा कायदा आहे. तेथे मुस्लीम बहुसंख्य आहेत. त्यांनाही इतर कोणत्याही प्रकारच्या छळाचा सामना करावा लागला आणि त्यापायी भारतात आश्रय घ्यावा लागला, तर त्यांना इतर कायद्यांनुसार प्रवेश आहेच. खरे तर अनेक अफगाण निर्वासित भारतात राहतात. या देशांमध्ये राजकीय अस्थिरता आणि अल्पसंख्याकांवरील हिंसाचाराच्या घटना नित्याच्याच आहेत, परिणामी तेथे छळ झालेल्या अल्पसंख्यांकांचे- मोठ्या प्रमाणात हिंदू, बौद्ध, शीख आणि ख्रिश्चन यांचे- भारताच्या सीमावर्ती राज्यांमध्ये स्थलांतर होत असते. हा ओघ सतत चालू असतोच पण तो काही वेळा प्रचंड प्रमाणात वाढला आहे :

१९७१ च्या बांगलादेश युद्धात पूर्व पाकिस्तानातून एक कोटींहून अधिक निर्वासित बंगाल, बिहार आणि आसाममध्ये आले. १९९० च्या दशकात बांगलादेशच्या काही भागांमध्ये जातीय दंगली उसळल्या तेव्हाही ओघ असाच वाढलेला दिसला. याच १९९० च्या दशकात कट्टरपंथी इस्लामवाद्यांनी अफगाणिस्तानचा ताबा घेतल्याने हिंदू आणि शीख, विशेषत: काबूल आणि कंदाहारमधून आले. पाकिस्तानच्या बाबतीतही, हा अल्पसंख्यांकांचा ओघ कायम आहे. 'सीएए'ची व्याप्ती अगदी मर्यादित आहे आणि ती या प्रवाहाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपचे हिंदुत्व थापेबाज आहे!

## » उमरखेडच्या सभेत उद्धव ठाकरे यांची टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात महाविकास आघाडीचे समीकरण जुळल्यानंतर ही शिवसेनेची पहिलीच निवडणूक आहे. या निवडणुकीत विरोधकांचे डिपॉझिट जप्त करून दाखवू, असा विश्वास शिवसेना (उबाठा) चे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. ते आज मंगळवारी दुपारी उमरखेड येथे आयोजित सभेत बोलत होते. हिंगोली-उमरखेड लोकसभा मतदारसंघात सोमवारपासून उद्धव ठाकरे यांची जनसंवाद सभा सुरू आहे.**



उमरखेड विधानसभा मतदारसंघ हिंगोली लोकसभा मतदारसंघात समाविष्ट आहे. त्या अनुषंगाने उद्धव ठाकरे यांनी आज उमरखेड येथे आयोजित जनसंवाद सभेस संबोधित केले. यावेळी खा. संजय राऊत यांच्यासह शिवसेना उबाठा आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे समीकरण कसे अस्तित्वात आले, हा इतिहास सर्वांना माहिती आहे. मात्र या समीकरणानंतर शिवसेनेची ही पहिली निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत मूळ शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. विरोधकांचे डिपॉझिट जप्त करून ही निवडणूक कशी जिंकून दाखवू शकतो, यासाठी ही निवडणूक शिवसेनेसाठी महत्वाची आहे, असे उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले. आपण राज्यात अडीच वर्षे उत्तम सरकार चालवून दाखविले. अगदी कोरोना काळात देशातील सर्वोत्तम काम करणारा मुख्यमंत्री म्हणून आपला गौरव झाला. मात्र हा गौरव येथील जनतेचा होता. नागरिकांनी साथ दिल्यामुळे सरकार, प्रशासन उत्तम चालवू शकलो, असे उद्धव ठाकरे म्हणाले.उद्धव ठाकरे यांनी यावेळी हिंगोलीचे विद्यमान खासदार हेमंत पाटील यांच्यावर नाव न घेता सडकून टीका केली. येथील खासदार काय होते, हे सर्वांना माहिती आहे. शिवसेनेने त्यांना सर्वकाही दिले. आमदार, खासदार केले. आपण मुख्यमंत्री असताना हिंगोली जिल्ह्यात हळद प्रक्रिया प्रकल्पास मंजुरी दिली. मात्र, येथील आमदार, खासदार हळद लावून मिंधेंच्या बोहल्यावर चढले, अशी टीका ठाकरे यांनी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही ठाकरे यांनी हल्लाबोल चढविला. त्यांना महत्वाचे खाते दिले होते. मात्र, काही जणांची भूक कितीही खाल्लं तरी भागत नाही. त्यांना भस्म्यारोग झाला आहे, असे म्हणतात. तर काही जणं अजीर्ण होईपर्यंत खातात. शिवसेनेतून गेलेले काही गद्दार हे भस्म्यारोग झाल्याने गेले, तर काहीजण खावून खावून अर्जीण झाल्याने गेले, अशी टीका ठाकरे यांनी यावेळी केली. कितीही संकटे आली तरी शिवसेना सर्व संकटांच्या छाताडावर पाय देवून मार्गक्रमण करणारी संघटना आहे. तळागळातील शिवसैनिक हे या संघटनेचे ऊर्जास्रोत आहे, असे ठाकरे यावेळी म्हणाले.या सभेत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर 'भाडोत्री जनता पक्ष' या शब्दांत टीका करून, भाजपला आपला नेता देशापेक्षा मोठा आहे.

### देशापेक्षा मोदी मोठे आहेत

» ,"आम्ही देशभक्त आहोत. १७ तारखेच्या सभेत इंडिया आघाडीचे नेते आले होते. अथांग जनसागर होता. मी नेहमी सुरुवात करतो जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो भगिनींनो आणि मातांनो, हे काही मी सोडलेलं नाही. मोदींनी तर इंडिया आघाडीला इंडियन मुजाहिदीनचं नाव त्यांनी दिलं होतं. त्यामुळे मी म्हटलं होतं जमलेल्या माझ्या तमाम देशभक्त बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो.." मी यात काय चुकीचं बोललो?" "मी हे बोलल्यानंतर मिंधे दाढी खाजवत तिकडे गेले ते बोलले.. काँग्रेस बरोबर हे गेले यांची भाषाच बदलली. अहो मिंधे तुम्ही मोदीभक्त, नमोभक्त झालेला आहात. आम्ही मोदीभक्त नाही आम्ही देशभक्त आहोत. नरेंद्र मोदींची पालखी वाहण्यासाठी माझ्या वडिलांनी शिवसेनेची स्थापना केली नाही. जनतेच्या न्याय हक्कासाठी शिवसेनेची स्थापन केली. तुम्ही फक्त पालखीचे भोयी व्हा. मला मोदी भक्तांना हा सवाल आहे की जो मोदीभक्त आहे तो देशभक्त नाही का? जर देशभक्त असाल तर पोटात कशाला दुखतं आहे? भाडोत्री जनता पक्षाला जर असं वाटत असेल की देशापेक्षा मोदी मोठे आहेत तर ते चालणार नाही, आम्ही ते खपवून घेणार नाही." असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

# नांदगावकर यांना दक्षिण मुंबई मतदारसंघातून उमेदवारी?

## » शाहांच्या बैठकीत सकारात्मक चर्चा : बाळा नांदगावकर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी १४ तास दिल्लीत ताटकळत काढल्यानंतर मंगळवारी दुपारी साडेबारानंतर अखेर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.**

या नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. या बैठकीत नेमक्या कोणत्या मुद्द्यावर चर्चा झाली हे अद्याप अस्पष्ट असलं तरीही आगामी लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे महायुतीत असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. राज ठाकरे दिल्लीतून मुंबईत परतले असून मनसे नेते बाळा नांदगावकर आणि अविनाश जाधव यांनी त्यांची भेट घेतली. बाळा नांदगावकर यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. पत्रकारांना माहिती देताना नांदगावकर म्हणाले, राज ठाकरे आणि अमित ठाकरे काल दिल्लीत गेले होते. दिल्लीत त्यांनी अमित शाहांबरोबर मीटिंग घेतली. आज ते मुंबईत पोहोचले आहेत. ते मुंबईत आल्यानंतर मी आणि अविनाश जाधव आम्ही त्यांची भेट घेतली. अमित शाहांच्या बैठकीत



सकारात्मक चर्चा झाली आहे. येत्या २-४ दिवसांत निर्णय घेतला जाईल.दरम्यान, किती जागांसाठी मनसेने मागणी केली आहे? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, किती जागांची मागणी केली हे मी सांगू शकत नाही. परंतु, जी काही मागणी केली आहे, त्यावर फलदायी चर्चा झाली आहे.मनसे लोकसभा निवडणूक लढवणार हे निश्चित झाल्यापासून दक्षिण मुंबई मतदारसंघातून बाळा नांदगावकर यांच्या उमेदवारीची चर्चा आहे. तसंच, महायुतीत समाविष्ट झाल्यानंतरही या जागेसाठी मनसे आग्रही असण्याची शक्यता आहे.

### या नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली

» पुढील महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला मदत करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.महाराष्ट्र निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी १४ तास दिल्लीत ताटकळत काढल्यानंतर मंगळवारी दुपारी साडेबारानंतर अखेर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली.

यावर बाळा नांदगावकर म्हणाले, कोणाला कुठून उमेदवारी द्यायची याबाबत पक्ष निर्णय घेईल. माझ्या इच्छेनुसार इथे काही होणार नाही. जे पक्ष नेतृत्वाला वाटतं तेच या पक्षात होतं.२०१९ मध्ये राज ठाकरे यांच्या मनसेने लोकसभेची निवडणूक लढवली नव्हती. मात्र, त्यावेळी त्यांनी महाराष्ट्रभर पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपविरोधात जोरदार प्रचार केला होता. राज ठाकरे यांच्या 'लाव रे तो व्हीडिओ' हे विधान कमालीचे चर्चेत होते. मात्र, पाच वर्षांनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली असून राज ठाकरे यांनीही राजकीय भूमिका बदलली आहे.

# मनसेच्या एन्ट्रीने रस्सीखेच वाढली!

## » जागावाटप अंतिम टप्प्यात असल्याचा मुख्यमंत्र्यांचा दावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून जागावाटपाला वेग आला आहे. यंदाची निवडणूक इंडिया आघाडी विरुद्ध एनडीए अशी रंगणार आहे. या दोन्ही आघाड्यांमध्ये अनेक घटकपक्ष असल्याने जागा वाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. हा तिढा सोडवण्याचा प्रयत्न वरिष्ठ पातळीवर केला जातोय. शिंदेंच्या शिवसेनेतही असाच तिढा निर्माण झाला आहे. याकरता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विद्यमान खासदारांची बैठक घेतली. ही बैठक नुकतीच संपली असून यानंतर खासदार राहुल शेवाळे यांनी माध्यमांशी संवाद साधत बैठकीतील इतिवृत्त दिलं आहे.**



खासदार राहुल शेवाळे म्हणाले, “मुख्यमंत्र्यांनी आज विद्यमान खासदारांची सकाळी ११ वाजता बैठक बोलावली होती. विद्यमान खासदारांच्या मतदारसंघांची माहिती त्यांनी जाणून घेतली असून त्यासंदर्भात त्यांनी चर्चा केली. भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून महायुतीच्या जागावाटपासंदर्भात निर्णय होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचित केलं.”दरम्यान, जागावाटपात अनेक खासदार नाराज असल्याच्या चर्चा आहेत. या चर्चेवर उत्तर देताना राहुल शेवाळे म्हणाले, खासदारांची नाराजी नाही. खासदारांचा मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. खासदारांनी एकच चिंता व्यक्त केली की प्रसार माध्यमातून महायुतीसंदर्भात वेगळं वातावरण निर्माण होतंय. असं वातावरण निर्माण होऊ नये याकरता महायुतीच्या सर्व घटकपक्षांच्या वरिष्ठ नेत्यांना सूचना देण्यात याव्यात. महायुतीचा फॉर्म्युला घोषित होत नाही तोवर कोणत्याही नेत्याने वक्तव्य करू नये, असं राहुल शेवाळे म्हणाले.“महायुतीत एकवाक्यता आहे. महायुतीत सर्वांचा सन्मान राखला जाईल आणि महाराष्ट्रात ४५ पेक्षा जास्त जागा जिंकणे हा महायुतीत समान फॉर्म्युला आहे. त्यामुळे, सर्वांचा सन्मान राखून जागावाटप होणार आहे. दोन दिवसांत याबाबत घोषणा होईल, असंही ते म्हणाले.जागावाटपाची चर्चा सुरू असताना महायुतीमध्ये आणखी एक नवा भिडू येण्याची शक्यता आहे.

राज ठाकरे यांनी आज केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीमुळे राज ठाकरेही महायुतीत सामील होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज ठाकरे महायुतीत आल्यानंतर जागा वाटपाचा कसा राहील याकडे सर्वांचं लक्ष आहे. खासदार राहुल शेवाळे म्हणाले, “मुख्यमंत्र्यांनी आज विद्यमान खासदारांची सकाळी ११ वाजता बैठक बोलावली होती. विद्यमान खासदारांच्या मतदारसंघांची माहिती त्यांनी जाणून घेतली असून त्यासंदर्भात त्यांनी चर्चा केली. भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून महायुतीच्या जागावाटपासंदर्भात निर्णय होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचित केलं.”दरम्यान, जागावाटपात अनेक खासदार नाराज असल्याच्या चर्चा आहेत. या चर्चेवर उत्तर देताना राहुल शेवाळे म्हणाले, खासदारांची नाराजी नाही. खासदारांचा मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. खासदारांनी एकच चिंता व्यक्त केली की प्रसार माध्यमातून महायुतीसंदर्भात वेगळं वातावरण निर्माण होतंय. असं वातावरण निर्माण होऊ नये याकरता महायुतीच्या सर्व घटकपक्षांच्या वरिष्ठ नेत्यांना सूचना देण्यात याव्यात. महायुतीचा फॉर्म्युला घोषित होत नाही तोवर कोणत्याही नेत्याने वक्तव्य करू नये, असं राहुल शेवाळे म्हणाले.“महायुतीत एकवाक्यता आहे. महायुतीत सर्वांचा सन्मान राखला जाईल आणि महाराष्ट्रात ४५ पेक्षा जास्त जागा जिंकणे हा महायुतीत समान फॉर्म्युला आहे. त्यामुळे, सर्वांचा सन्मान राखून जागावाटप होणार आहे. दोन दिवसांत याबाबत घोषणा होईल, असंही ते म्हणाले.जागावाटपाची चर्चा सुरू असताना महायुतीमध्ये आणखी एक नवा भिडू येण्याची शक्यता आहे.

### महायुतीत नवा भिडू येणार?

» राज ठाकरे यांनी आज केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीमुळे राज ठाकरेही महायुतीत सामील होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज ठाकरे महायुतीत आल्यानंतर जागा वाटपाचा फॉर्म्युला कसा राहील याकडे सर्वांचं लक्ष आहे.भाजपसोबत गेल्यावर एकनाथ शिंदे यांच्या गटांच्या ताब्यात असलेल्या जागांवर भाजपने दावा सांगितल्याने आधीच नाराज असलेल्या शिवसेनेत असंतोष दिसत असून अनेक विद्यमान खासदारांना घरी बसावे काग्नर असल्याने पक्षात चिंता वाढली असताना राज ठाकरे यांची एंट्री होत असल्याची कुणकुण लागताच अनेक खासदारांनी आपल्या जागा कुणालाही देऊ नका असे बैठकीत एकनाथ शिंदे याना सांगितले असल्याची माहिती आहे. लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून जागावाटपाला वेग आला आहे. यंदाची निवडणूक इंडिया आघाडी विरुद्ध एनडीए अशी रंगणार आहे. या दोन्ही आघाड्यांमध्ये अनेक घटकपक्ष असल्याने जागा वाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. हा तिढा सोडवण्याचा प्रयत्न वरिष्ठ पातळीवर केला जातोय. एकनाथ शिंदे यांनी आज विद्यमान खासदारांची बैठक घेतली. ही बैठक नुकतीच संपली असून यानंतर खासदार राहुल शेवाळे यांनी माध्यमांशी संवाद साधत बैठकीतील इतिवृत्त दिलं आहे.

# सीएएला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## » न्यायालयाने केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत दिली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेने मंजुरी दिल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी वादग्रस्त नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) केंद्र सरकारने गेल्या सोमवारी (११ मार्च) लागू केला. त्यासंदर्भातील अधिसूचनादेखील काढण्यात आली आहे. सरकारने राजकीय फायद्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या महिनाभर आधी हा निर्णय घेतल्याची टीका होत आहे. तसेच या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकादेखील सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत.**

अशा २३७ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज (१९ मार्च) सुनावणी घेण्यात आली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने या याचिकांवर सुनावणी घेतली. दरम्यान, आजच्या सुनावणीवेळी न्यायमूर्तींनी सीएएवर कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच न्यायालयाने केंद्र सरकारला पुढील तीन आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकांमध्ये मांडलेल्या मुद्द्यांवर आणि प्रश्नांवर केंद्र सरकारला उत्तर देण्यास सांगितलं आहे. सुनावणीवेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केंद्र सरकारच्या



प्रतिनिधिंना प्रश्न विचारला की, अधिसूचनेवर स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी तुम्हाला किती वेळ लागेल? यावेळी केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात हजर असलेले महाधिवक्ते म्हणाले, आम्हाला किमान चार आठवडे लागतील. त्यावर न्यायालयाने केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत दिली. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल रोजी होईल, असं सांगितलं. याचिकाकर्त्यांपैकी एकाचे वकील कपिल सिब्बल यांनी केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत देण्याच्या निर्णयाचा विरोध केला. सिब्बल म्हणाले, सीएए पारित होऊन चार वर्षे झाली आहेत. चार वर्षांत त्यांनी (केंद्र सरकार) अशी माहिती गोळा करून ठेवायला हवी होती. तसेच आता लोकांना नागरिकत्व बहाल केलं गेलं तर नंतर ते नागरिकत्व काढून घेणं अवघड होईल. तसं झाल्यास या सर्व याचिका कुचकामी ठरतील. चार वर्षांनंतर केंद्राला अशी कुठली घाई होती की अचानक त्यांनी यासंबंधीची अधिसूचना काढली? त्यामुळे न्यायालयाने या अधिसूचनेवर स्थगिती द्यावी.

### कायदा चार वर्षांपूर्वी पारित झाला होता

» भारताच्या संसदेने ११ डिसेंबर २०१९ रोजी सीएए पारित केला होता. परंतु, सीएएमुळे देशातील मुस्लिमांना लक्ष्य केले जाण्याचा धोका असल्याचा मुद्दा उपस्थित करत विविध राज्यांमध्ये या कायद्याला तीव्र विरोध झाला होता. देशभर हिंसक विरोध होऊ लागल्यामुळे केंद्र सरकारने कायद्याची अंमलबजावणी लांबणीवर टाकली होती. आता निवडणुकीच्या तोंडावर कायदा लागू केल्यामुळे भाजपच्या हाती राजकीय आयुध मिळाल्याचे मानले जात आहे. त्या दिवशी बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून भारतात आलेल्या गैर-मुस्लीम स्थलांतरितांना नागरिकत्व देण्याची तरतूद आहे.

# बादशाहने हनी सिंगची उडवली खिल्ली

रॅपर आणि बॉलीवूड गायक बादशाह त्याच्या सुपरहिट गाण्यांमुळे नेहमी चर्चेत असतो. बादशाहची 'सॅटरडे-सॅटरडे', 'डीजेवाले बाबू', 'जुग्नू' अशी अनेक गाणी लोकप्रिय ठरली. अशाचप्रकारे एकेकाळी हनी सिंगनेसुद्धा आपल्या गाण्यांनी लोकांची मन जिंकली होती. हनी सिंगने या इंडस्ट्रीमधून काही काळ विश्रांती घेत पुन्हा एकदा जोरदार कमबॅक केलं. या दोन्ही कलाकारांमध्ये भांडण असल्याच्या चर्चा अनेकदा समोर आल्या आहेत. अशातच आता बादशाहने हनी सिंगची खिल्ली उडवल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. सध्या बादशाहचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. बादशाहच्या एका कॉन्सर्टदरम्यान त्याचं गाणं सुरू असताना हनी सिंगच्या चाहत्यांनी मध्येच हनी सिंगच्या नावाचा जयघोष करायला सुरुवात केली. त्यावर बादशाहने त्यांना प्रत्युत्तर दिलं. बादशाह योयो हनी सिंगच्या चाहत्यांना म्हणाला, "तुम्हीपण इथे आला आहात का? एक पेन आणि पेपर द्या जरा, तुमच्यासाठी मी गिफ्ट घेऊन आलो आहे. काही गाणी लिहून देतो, मग तुमच्या पप्पाचा चांगला कमबॅक होईल. तुमच्याकडे आता हेच काम राहिलंय."बादशाहचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सगळीकडे व्हायरल होतोय. हा व्हिडीओ समोर येताच योयो हनी सिंग आणि बादशाहचे चाहते एकमेकांबरोबर भांडू लागले. अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया कमेंट सेक्शनमध्ये मांडल्या. एकाने कमेंट करत लिहिले, "बादशाहने तर योयो हनी सिंगचा अनादर केला", तर दुसऱ्याने लिहिले, "पहिले याला स्वत:ला गाणं लिहायला शिकू दे."

# हृतिक-दीपिकाचा 'फायटर' येणार ओटीटीवर

हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोणच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. २०२४ च्या पहिल्याच महिन्यात बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा 'फाइटर' आता ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. सिद्धार्थ आनंदच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या, या हवाई-ॲक्शन चित्रपटाने देशात २१२.६२ कोटी रुपयांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले होते, तर जगभरात या चित्रपटाने एकूण ६५८.७४ कोटी रुपये कमावले होते. आता निर्माते हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित करण्याची तयारी करत आहेत. 'फायटर'मध्ये हृतिक रोशन, दीपिका पदुकोणसह अनिल कपूर, करण सिंग ग्रोव्हर, अक्षय ओबेरॉय आणि संजीदा शेख यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट २०१९ मध्ये भारतीय हवाई दलाच्या बालाकोट हवाई हल्ल्यावर बेतलेला आहे. 'फायटर' वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच २५ जानेवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने सुरुवातीच्या दिवसांत प्रचंड नफा कमावला, पण नंतर त्याचा वेग मंदावला. परंतु चित्रपटाच्या कथेचे अन् त्यातील एरियल ॲक्शनचे प्रचंड कौतुक झाले.गेल्या महिन्यात फेब्रुवारीच्या सुरुवातीपासूनच 'फायटर'च्या ओटीटी प्रदर्शनाची चर्चा सुरू होती. निर्मात्यांनी अद्याप याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी चाहत्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी सर्व तयारी सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर्षी, होळीचा सण देशभरात २५ – २६ मार्च रोजी साजरा होणार आहे, त्यामुळे होळीच्या आगोदर हा चित्रपट ओटीटी वर प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे.

# विक्रांतचं बदललं आयुष्य



२०२३मध्ये सुपरहिट झालेल्या चित्रपटांपैकी एक म्हणजे 12TH FAIL. या चित्रपटात नायकाची भूमिका साकारणाऱ्या विक्रांत मेस्सीला सर्वोत्कृष्ट अभिनेता या पुरस्काराने गौरविण्यात आलं. अनेक दिग्गज कलाकारांनी या चित्रपटाचं कौतुक केलं. अभिनय क्षेत्रात सुरू असलेल्या प्रवासाबरोबरच विक्रांतचा वैयक्तिक आयुष्यातला प्रवासही सुरू झाला होता, कारण विक्रांत नुकताच बाबा झाला होता. पिता झाल्यानंतर आयुष्य कसं बदललं याबद्दल एका मुलाखतीत त्याने सांगितलं आहे. नुकत्याच झालेल्या पिंकविलाच्या पुरस्कार सोहळ्यात विक्रांतने हजेरी लावली होती. तिथे दिलेल्या मुलाखतीत विक्रांत म्हणाला, "माझ्या बाळाचे ढेकर काढून घेण्यात, बाळाचे डायपर्स बदलण्यात मी एवढा माहीर असेन असं मला वाटलं नव्हत. मला वाटतं की, बाळाची जबाबदारी घेणे हे माझे कर्तव्य आहे आणि मी हे सगळं करण्यात आता तज्ज्ञ झालो आहे.पहिल्यांदाच वडील होण्याची भावना शेअर करत विक्रांत म्हणाला, "ज्याचे मी स्वप्न पाहिलं होतं तसचं आयुष्य मी आता जगतोय. परंतु, ही भावना मी शब्दांत मांडू शकत नाही; कारण ही भावना शब्दांत मांडण्यापेक्षाही अधिक आहे."

# बांदेकरांनी सांगितला बॉलीवूडचा अनुभव

सुचित्रा बांदेकर यांनी केवळ मराठीतच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' चित्रपटात त्यांनी साकारलेलं 'सुचित्रा भोसले' हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. याशिवाय त्या रणवीर सिंहबरोबर 'सिम्बा' चित्रपटात झळकल्या होत्या. अलीकडेच त्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजमध्येही झळकल्या होत्या. त्यांचा बॉलीवूडमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत सुचित्रा बांदेकर यांनी भाष्य केलं आहे. सुलेखा तळवलकर यांच्या 'दिल के करीब' कार्यक्रमात त्यांना हजेरी लावली होती. बॉलीवूडमध्ये गाजलेल्या 'सिंघम' चित्रपटात काम करण्याची संधी कशी मिळाली याबद्दल सांगताना सुचित्रा बांदेकर म्हणाल्या, ""सिंघम'च्या वेळी मला एका गृहस्थाचा फोन आला होता. त्यांनी मला फोनवर 'सुचित्रा बांदेकर का? आम्हाला तुम्हाला कास्ट करायचं आहे. रोहित शेट्टी प्रोडक्शनमधून बोलतोय.' कारण, मला त्या पहिल्या फोनवर 'द रोहित शेट्टी' आहे, तो मोठा दिग्दर्शक असं काहीच सुचलं नाही."सुचित्रा पुढे म्हणाल्या, "त्यानंतर त्या गृहस्थाने मला पुन्हा फोन केला आणि तुम्हाला कळतंय का मला काय म्हणायचंय? असा प्रश्न त्याने मला विचारला. यावर मी म्हणाले.




# क्रितीने सासरच्यांसाठी बनवला खास पदार्थ


अभिनेत्री क्रिती खरबंदा काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. १६ मार्चला क्रितीने अभिनेता पुलकित सम्राटबरोबर लग्नगाठ बांधली. मोठ्या थाटामाटात, रितीरिवाजानुसार क्रिती व पुलकितचा लग्नसोहळा पार पडला. दोघांच्या लग्नसोहळ्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. सध्या क्रितीने लग्नानंतर पहिल्यांदाच बनवलेल्या खास पदार्थचा फोटो चांगलाच चर्चेत आला आहे. अभिनेत्री क्रिती खरबंदाने तिच्या इन्स्टाग्रामवर या खास पदार्थचे फोटो शेअर केले आहेत. लग्नानंतर पहिल्यांदाच अभिनेत्रीनं सासरच्यांसाठी हलवा बनवला होता. क्रितीच्या हातचा हलवा तिच्या आजी देखील आवडला. हे फोटो शेअर करत क्रितीने लिहिलं आहे की, मी बनवलेला पहिला पदार्थ.या फोटोमध्ये क्रिती गुलाबी सलवार सूटमध्ये दिसत आहे. हातात लाल रंगाच्या बांगड्या, गळ्यात मंगळसूत्र अशा लूकमध्ये अभिनेत्री पाहायला मिळत आहे. दरम्यान, २०१९मध्ये प्रदर्शित झालेल्या 'पागलपंती' या चित्रपटाच्या सेटवर क्रिती-पुलकित एकमेकांच्या जवळ आले आणि त्यानंतर दोघं डेट करू लागले. या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान अभिनेत्रीनं रिलेशनशिपबद्दल जाहीर केलं. दोघांच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, पुलकित शेवटचा 'फुकरे ३' चित्रपटात झळकला होता. तर क्रिती लवकरच 'रिस्की रोमिया' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात अभिनेत्री सनी सिंहबरोबर झळकणार आहे. दोघांच्या लग्नसोहळ्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. सध्या क्रितीने लग्नानंतर पहिल्यांदाच बनवलेल्या खास पदार्थचा फोटो चांगलाच चर्चेत आला आहे. अभिनेत्री क्रिती खरबंदाने तिच्या इन्स्टाग्रामवर या खास पदार्थचे फोटो शेअर केले आहेत. लग्नानंतर पहिल्यांदाच अभिनेत्रीनं सासरच्यांसाठी हलवा बनवला होता. क्रितीच्या हातचा हलवा तिच्या आजी देखील आवडला. हे फोटो शेअर करत क्रितीने लिहिलं आहे की, मी बनवलेला पहिला पदार्थ.या फोटोमध्ये क्रिती गुलाबी सलवार सूटमध्ये दिसत आहे. अभिनेत्री क्रिती खरबंदा काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. १६ मार्चला क्रितीने अभिनेता पुलकित सम्राटबरोबर लग्नगाठ बांधली. मोठ्या थाटामाटात, रितीरिवाजानुसार क्रिती व पुलकितचा लग्नसोहळा पार पडला. दोघांच्या लग्नसोहळ्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. सध्या क्रितीने लग्नानंतर पहिल्यांदाच बनवलेल्या खास पदार्थचा फोटो चांगलाच चर्चेत आला आहे. अभिनेत्री क्रिती खरबंदाने तिच्या इन्स्टाग्रामवर या खास पदार्थचे फोटो शेअर केले आहेत. लग्नानंतर पहिल्यांदाच अभिनेत्रीनं सासरच्यांसाठी हलवा बनवला होता. अभिनेत्री क्रिती खरबंदाने तिच्या इन्स्टाग्रामवर या खास पदार्थचे फोटो शेअर केले आहेत. लग्नानंतर पहिल्यांदाच अभिनेत्रीनं सासरच्यांसाठी हलवा बनवला होता. क्रितीच्या हातचा हलवा तिच्या आजी देखील आवडला.

# सुर्याने शेअर केला हार्टब्रोकन इमोजी !

## सुरुवातीचे सामने दुखापतीमुळे खेळताना दिसणार नाही

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्सचा आघाडीचा फलंदाज सूर्यकुमार यादव यंदाच्या आयपीएल २०२४ मधून पुनरागमन करेल अशी अपेक्षा होती. पण सूर्यावर झालेल्या शस्त्रक्रियेमुळे तो सुरुवातीचे काही सामने खेळताना दिसणार नाही. मुंबई इंडियन्सकडून खेळणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या उपलब्धतेबाबत, संघाचे मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर म्हणाले की, “मुंबई इंडियन्स भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वैद्यकीय टीमसोबत संपर्कात आहे आणि याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. पण आता सूर्यकुमार यादवने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर हार्टब्रोकन इमोजी शेअर केला आहे. सूर्यकुमार यादव आयपीएल २०२४ च्या संपूर्ण हंगामातून बाहेर पडणार की काय, असे चित्र दिसत आहे.**




आयसीसी टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या सूर्यकुमार यादवने यावर्षी अद्याप एकही सामना खेळलेला नाही. भारतीय संघ डिसेंबर-जानेवारीमध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर होती, जिथे भारताला तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकाही खेळायची होती. सूर्यकुमार यादवने तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत चांगली कामगिरी केली होती आणि त्याला मालिकावीर देखील निवडण्यात आले होते. यानंतर त्याच्या घोट्याच्या आणि मांडीच्या दुखापतीमुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली.सूर्यकुमारने चार दिवसांपूर्वी एक व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये तो वर्कआउट करताना दिसत होता. सूर्यकुमार यादव सध्या बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये असून त्याचे फिटनेस परत मिळवत आहे. १७ जानेवारीला सूर्यकुमार यादव यांनी त्याच्या शस्त्रक्रियेबाबत अपडेट दिले होते, ज्यामध्ये तो लवकरच परतणार असल्याचे लिहिले होते. आयपीएल २०२४ मध्ये रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्स संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. IPL 2024 पूर्वी मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाने हार्दिक पांड्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली होती. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने पाच आयपीएल विजेतेपदे जिंकली आहेत. रोहित शर्मा आयपीएल २०२४ मध्ये एक खेळाडू म्हणून खेळताना दिसणार आहे. रोहित शर्मा मुंबईच्या ताफ्यात पुन्हा सामील झाला आहे. सूर्यकुमार यादवसाठी २०२४ टी-२० विश्वचषकाच्या दृष्टिकोनातूनही आयपीएल खूप महत्त्वाचे आहे. २ जूनपासून आयपीएलनंतर लगेचच आयसीसी टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. सूर्या शेवटचा सामना १४ डिसेंबर रोजी खेळला होता आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात ५६ चेंडूत शतक झळकावले.आयसीसी टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या सूर्यकुमार यादवने यावर्षी अद्याप एकही सामना खेळलेला नाही. भारतीय संघ डिसेंबर-जानेवारीमध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर होती, जिथे भारताला तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकाही खेळायची होती. सूर्यकुमार यादवने तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत चांगली कामगिरी केली होती आणि त्याला मालिकावीर देखील निवडण्यात आले होते. यानंतर त्याच्या घोट्याच्या आणि मांडीच्या दुखापतीमुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. सूर्यकुमारने चार दिवसांपूर्वी एक व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये तो वर्कआउट करताना दिसत होता. सूर्यकुमार यादव सध्या बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये असून त्याचे फिटनेस परत मिळवत आहे.

### तो लवकरच परतणार

» १७ जानेवारीला सूर्यकुमार यादव यांनी त्याच्या शस्त्रक्रियेबाबत अपडेट दिले होते, ज्यामध्ये तो लवकरच परतणार असल्याचे लिहिले होते. आयपीएल २०२४ मध्ये रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्स संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. IPL 2024 पूर्वी मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाने हार्दिक पांड्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली होती. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने पाच आयपीएल विजेतेपदे जिंकली आहेत. रोहित शर्मा आयपीएल २०२४ मध्ये एक खेळाडू म्हणून खेळताना दिसणार आहे. रोहित शर्मा मुंबईच्या ताफ्यात पुन्हा सामील झाला आहे. सूर्यकुमार यादवसाठी २०२४ टी-२० विश्वचषकाच्या दृष्टिकोनातूनही आयपीएल खूप महत्त्वाचे आहे. २ जूनपासून आयपीएलनंतर लगेचच आयसीसी टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. सूर्या शेवटचा सामना १४ डिसेंबर रोजी खेळला होता आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात ५६ चेंडूत शतक झळकावले.

# केएल राहुल आयपीएल खेळण्यासाठी फिट!

## स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात विकेट कीपिंग न करण्याचा सल्ला

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**येत्या २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या २०२४ हंगामासाठी केएल राहुलला फिट घोषित करण्यात आले आहे. लखनऊ सुपर जायंट्स (LSG) कर्णधाराला बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने फिट घोषित केल्याने तो पुढील दोन दिवसांत संघात सामील होईल. एलएसजी रविवारी जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे.**



बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने राहुलला स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात विकेट कीपिंग न करण्याचा आणि तज्ञ फलंदाज म्हणून खेळण्याचा सल्ला दिल्याची माहिती मिळाली आहे.“तो फिट आहे आणि येत्या काही दिवसांत तो त्याच्या आयपीएल फ्रँचायझीमध्ये सामील होऊ शकतो. त्याला क्वाड्रिसेप्समध्ये वेदना होत होत्या आणि त्याला एक इंजेक्शन देखील देण्यात आले होते. त्याचे पुनर्वसन झाले असून एनसीएने आता त्याला तंदुरुस्त घोषित केले आहे. यासोबतच त्याला लगेचच विकेटकीपिंग करू नये असा सल्ला देण्यात आला आहे,” असे भारतीय बोर्डाच्या एका सूत्राने सांगितले.इंग्लंडविरूध्दच्या हैदराबाद कसोटीनंतर राहुलने उजव्या क्वाड्रिसेप्समध्ये वेदना होत असल्याची तक्रार केली आणि नंतर इंग्लंडविरुद्धच्या घरच्या संपूर्ण मालिकेतून तो बाहेर पडला. बीसीसीआयने सुरुवातीला सांगितले होते की राहुल सामना खेळण्यासाठी ९० टक्के फिट आहे आणि बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली त्याची प्रगती चांगली होत आहे. पण नंतर त्यांनी इंग्लंडमधील तज्ज्ञांचा सल्ला घ्यायचे ठरवले आणि तज्ज्ञांचे मत जाणून घेण्यासाठी राहुल परदेशात गेला.दरम्यान, रणजी ट्रॉफी सामन्यातील शेवटचे दोन दिवस न खेळलेल्या श्रेयस अय्यरला रविवारी आयपीएल खेळण्यासाठी फिट घोषित करण्यात आले.

### राहुल पुढील दोन दिवसांत संघात

» पण याचसोबत श्रेयसला सल्लाही देण्यात आला की फॉरवर्ड डिफेन्स खेळताना त्याने पुढच्या पायावर जास्त जोर देऊ नये, अन्यथा त्याची दुखापत अधिक बळावेल. इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, अय्यरने नॅशनल क्रिकेट अकादमी मध्ये चर्चा केल्यानंतर मुंबईतील मणक्याच्या तज्ज्ञांना भेट दिली आणि डॉक्टरांनी त्याला पाय स्ट्रेच करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, असा सल्ला दिला.येत्या २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या २०२४ हंगामासाठी केएल राहुलला फिट घोषित करण्यात आले आहे. लखनऊ सुपर जायंट्स (LSG) कर्णधाराला बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने फिट घोषित केल्याने तो पुढील दोन दिवसांत संघात सामील होईल.